# पुणे प्राईम न्यूज

जनमानसाचा निडर आवाज...

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २३५ | शनिवार, २१ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210







## संक्षिप्त

### इराणच्या हल्ल्यात आखाती देश हादरले

**नवी दिल्ली, ता. २० :** इस्त्रायलने गॅसफिल्डवर हल्ला केल्यानंतर इराणने प्रतिहल्ला करत सौदी अरेबिया, कुवेत, कतार आणि यूएईमध्ये गॅस सुविधा आणि ऑईल रिफानयरींवर मिसाईली तसेच ड्रोनचा मारा केला आहे. सौदी अरेबियातील यान्बू बंदरात असलेल्या समरेफ तेल शुद्धीकरण प्रकल्पावर हवाई हल्ला झाला. होर्मुझची सामुद्रधुनी बंद असल्यामुळे, बहुतेक तेल आता यान्बू बंदरातून पाठवले जात आहे. याशिवाय, संयुक्त अरब अमिराती (UAE) आणि कतारमधील तेल आणि वायू प्रकल्पांवर ड्रोन हल्ले झाले. इराणने सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती आणि कतारमधील तेल प्रकल्पांची राख करण्याचा इशारा दिला आहे. इराणच्या आक्रमक पावित्र्यानंतर सौदीने आज इराणला कडक इशारा दिला आहे. सौदीचे परराष्ट्र मंत्री फैसल बिन फरहान अल सौद म्हणाले की, इराणला प्रत्युत्तर देण्याची आमच्या देशात पूर्ण ताकद आहे. इराणचे हल्ले पूर्वनियोजित असल्याचे दिसते आणि त्यांनी आमच्या संयमाची परीक्षा घेऊ नये.असे म्हणत इराणला इशारा दिला.

# छातीच्या दुखण्यावर बड्या रुग्णालयाचा अँजिओग्राफीचा सल्ला

## प्राथमिक आरोग्य केंद्रात अवघ्या ५ रुपयांत उपचार

## खासगी रुग्णालयांच्या उपचार पद्धतीवर प्रश्नचिन्ह

**लोणी काळभोर, ता. २० :** पूर्व हवेलीतील खासगी रुग्णालयां मधील उपचार पद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. छातीत दुखत असल्याने घाईघाईने मोठ्या खासगी रुग्णालयात दाखल झालेल्या ३७ वर्षीय रुग्णाला एकामागोमाग महागड्या चाचण्या सुचवून अखेर अँजिओग्राफीचा सल्ला देण्यात आला; मात्र दुसऱ्या दिवशी प्राथमिक आरोग्य केंद्रात अवघ्या काही मिनिटांत त्याला पित्ताचा त्रास असल्याचे निदान होऊन तो पूर्णपणे बरा झाला आहे.

या घटनेतील रुग्णाला काही महिन्यांपूर्वी रात्री आठच्या सुमारास अचानक छातीत तीव्र वेदना जाणवू लागल्या. घाबरलेल्या अवस्थेत त्याने पूर्व हवेलीतील एका नामांकित खासगी रुग्णालयात धाव




घेतली. रिसेप्शनमध्ये केसपेपर काढल्यानंतर डॉक्टरांनी प्राथमिक तपासणी केली आणि लगेच विविध चाचण्यांची यादी हातात दिली.

डॉक्टरांच्या सूचनेनुसार परिचारिकेने तातडीने ईसीजी (ECG) काढला. रिपोर्टमध्ये काहीही गंभीर आढळले नाही. त्यानंतर टू डी इको (२D Echo) चाचणी करण्यात आली; त्यातही कोणताही दोष दिसून आला नाही. यावरही समाधान न मानता डॉक्टरांनी पुढे TMT (ट्रेडमिल टेस्ट) करण्यास सांगितले.

छातीत दुखत असतानाही रुग्णाला २० ते २५ मिनिटे मशीनवर धावायला लावण्यात आले. या चाचणीतही कोणताही आजार निदान झाला नाही.

सलग तीन चाचण्यांनंतरही काही निष्पन्न न झाल्याने डॉक्टरांनी पुढील पायरी म्हणून अँजिओग्राफी करण्याचा सल्ला दिला. रुग्णाने ती चाचणी दुसऱ्या दिवशी करण्याचे सांगितले; मात्रतोपर्यंत रुग्णालयाने १२ हजार रुपयांचे बिल त्याच्या हातात दिले होते. घाबरलेल्या अवस्थेत रुग्णाने बिल भरले आणि तेथून निघून गेला.

दुसऱ्या दिवशी रुग्णाने थेट लोणी काळभोर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र गाठले. तेथे अवघ्या ५ रुपयांचा केसपेपर काढून डॉक्टरांकडून तपासणी करून घेतली. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करताच छातीत दुखण्यामागे हृदयाचा नव्हे तर पित्ताचा त्रास असल्याचे स्पष्ट केले. तातडीने इंजेक्शन देण्यात आले आणि काही गोळ्या रुग्नालयातूनच मोफत दिल्या. अवघ्या अर्ध्या तासात रुग्ण पूर्णपणे बरा झाला आणि त्यानंतर त्याला पुन्हा कधीच छातीत दुखण्याचा त्रास झाला नाही.

दरम्यान, या घटनेमुळे खासगी रुग्णालयांमधील चाचणी पद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. एका साध्या पित्ताच्या त्रासासाठी रुग्णाला महागड्या हृदयाच्या चाचण्यांच्या फेऱ्यात टाकण्यात आले का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

### सेकंड ओपिनियन नक्की घ्या

या प्रकरणामुळे रुग्णांनी कोणत्याही मोठ्या चाचण्या किंवा शस्त्रक्रियेपूर्वी किमान दोन ते तीन डॉक्टरांचा सल्ला घेणे किती आवश्यक आहे, हे पुन्हा स्पष्ट झाले आहे. तसेच, कोणत्याही रुग्णालयाला विशिष्ट लॅबमधूनच चाचण्या करण्याची सक्ती करण्याचा कायदेशीर अधिकार नाही, असे आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे. रुग्णांना आपल्या सोयीप्रमाणे आणि परवडेल त्या ठिकाणी उपचार घेण्याचा अधिकार आहे.

### रुग्णालयाकडून अन्याय झाला? तुमचा आवाज आम्हाला कळवा

रुग्णालय प्रशासनाकडून आपल्यावर अन्याय, अवाजवी बिलिंग किंवा सक्तीच्या चाचण्या लादल्या गेल्या असतील, तर आपण पुणे प्राईम न्यूजकडे लेखी किंवा व्हिडिओ स्वरूपात आपली हकीकत पाठवू शकता. तपासून पाहिल्यानंतर संबंधित रुग्णालयाचे नाव व प्रकरण वृत्तपत्रातून प्रसिद्ध करून नागरिकांचा आवाज प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे काम पुणे प्राईम न्यूज करणार आहे. सत्य मांडण्यासाठी आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी पुणे प्राईम न्यूज हे वृत्तपत्र तुमचे विश्वासाचे माध्यम आहे.

### अमेरिका इराण युद्ध थांबणार? डोनाल्ड ट्रम्प यांचे मोठं विधान

**नवी दिल्ली, ता. २१ :** इराण, इस्त्रायल आणि अमेरिकेतील युद्ध अधिकच भडकत असल्याचे दिसत आहे. या युद्धाचा जगभरात परिणाम झाल्याचे दिसत आहे. होर्मुज सामुद्रधुनी बंद असल्याने तेलाची निर्यात आणि आखात थांबली आहे. रिफायनरी आणि गॅस प्रकल्पांवरही मोठे हल्ले होताना दिसत आहेत. यामुळे अनेक देशात कच्चे तेल आणि गॅसचा तुटवडा आहे.

जागतिक बाजारात तेलाच्या किमती गगणाला पोहोचल्या आहेत. तेलाच्या किमतीवर नियंत्रण मिळवणे कठीण झाले. जगभरातून हे युद्ध थांबवण्याची मागणी सातत्याने केली जात आहे.

यादरम्यानच आता युद्ध थांबवण्याबद्दल अमेरिक्चे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मोठे विधान केले.

मला वाटते की, आता युद्ध संपले पाहिजे. इराण देखील हे युद्ध संपवण्याचा विचार करत आहे. अमेरिका आपली उद्दिष्ट्ये साध्य करण्याच्या खूप जवळ नक्कीच पोहोचली आहे. अमेरिका इराण युद्धातील आपली लष्करी कारवाई कमी करण्याचा विचार करत आहे, असे मोठे विधान डोनाल्ड ट्रम्प यांनी केले.

# खरात प्रकरण एपस्टीन फाईल्सपेक्षाही भयंकर; संजय राऊत यांची टीका

**मुंबई, ता. २० :** अशोक खरातचं प्रकरण हे एपस्टीन फाईल्सपेक्षा भयंकर आहे. मुख्यमंत्री कान, तोंड, डोळे बंद करून बसले आहेत. या भोंदूबाबाकडे कोण जात होतं, अघोरी कृत्य कोण करत होतं, ते मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या गुप्तचर यंत्रणेकडून जाणून घ्यावं, असे शिवसेना नेते-खासदार संजय राऊत म्हणाले.



महाराष्ट्राने अंधश्रद्धा निर्मूलन कायदा मंजूर केला आहे. मग असे असतानासुद्धा शासनातील मोठ्या पदावरील बसलेल्या व्यक्ती मग त्यात महिला आयोगाच्या अध्यक्षा असू देत किंवा मंत्री, आमदार हे सगळे अंधश्रद्धेने त्या बाबाची पूजा करत आहेत. कोणी जादूटोण्याला बसले आहे, त्यांच्यासोबत ज्यांची ज्यांची छायाचित्रे आली आहेत, त्यांच्यावर देवेंद्र फडणवीस यांनी अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याप्रमाणे गुन्हे दाखल केले पाहिजेत, अशी मागणी संजय राऊत यांनी केली.

महिला आयोगाच्या अध्यक्षांचे काम काय आहे की महिलांवर होणाऱ्या अत्याचारावर आवाज उठवणे, अशा गुन्हेगारांवर कारवाई करणे. मंत्री, नेते जर अशा लोकांच्या पायाजवळ बसत असतील तर महिला आयोगाच्या अध्यक्षा आणि मंत्र्यांना देवेंद्र फडणवीस पदावर का ठेवतात? ज्यांचे संबंध तिथे उघड होत आहेत त्यांना पदावरून दूर केले पाहिजे. सत्तेत टिकण्यासाठी मंत्रीच असे करणार असतील तर गृह मंत्रालयाने यांना बडतर्फ करायला हवे, असे संजय राऊत म्हणाले.

### राजीनाम्यानंतर चाकणकरांनी स्पष्ट केली भूमिका

**नाशिक, ता. २१ :** नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणामुळे उद्भवलेल्या वादानंतर रुपाली चाकणकर यांनी अखेर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. राजीनाम्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. चाकणकर म्हणाल्या की, माझे कुटुंब वारकरी संप्रदायातील असून अध्यात्मिक श्रद्धेपोटी आम्ही खरात पती-पत्नीला गुरु मानले होते. गुरुपौर्णिमो च्यानिमित्ताने पाद्यपूजा अनेकांनी केली, तशी मी आणि माझ्या पतीनेही केली. माध्यमांकडून दाखवले जाणारे व्हिडीओ हे काही वर्षांपूर्वीचे आहेत. खरातच्या चुकीच्या कृत्यांचे कधीही समर्थन करणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. खरातची दुसरी बाजू आम्हाला माहित नव्हती.

# इंदापुरात जागतिक चिमणी दिनानिमित्त पक्षांसाठी दाणापाणी उपक्रम उत्साहात

## चिमण्यांचे संरक्षण ही सामूहिक जबाबदारी : भरत शहा

**आदित्य बोराटे**

**इंदापूर, ता. २० :** चिमणीसारख्या लहान पक्ष्यांचे अस्तित्व टिकवणे म्हणजे पर्यावरणाचा समतोल जपणे होय. वाढत्या उन्हाळ्यात अन्न व पाण्याअभावी अनेक पक्ष्यांचे जीवन धोक्यात येत आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेऊन आपल्या घरासमोर, परिसरात पक्षांसाठी दाणे व पाण्याची व्यवस्था करावी, तसेच वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धनात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन इंदापूरचे नगराध्यक्ष भरतशेठ शहा यांनी केले.

इंदापूर नगरपरिषद व वृक्षप्रेमी सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने २० मार्च रोजी जागतिक चिमणी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाण्यासाठी भटकंती करणाऱ्या चिमण्या व इतर




पक्ष्यांच्या संरक्षणासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी प्लास्टिकच्या बाटल्यांपासून अन्न व पाणी साठवण्यासाठी विशेष भांडी तयार करण्यात आली. ही भांडी शहरातील रस्त्यालगतच्या झाडांवर तसेच व्ही. पी. कॉलेज परिसरातील झाडांवर बसविण्यात आली. त्यामुळे चिमण्या व इतर पक्ष्यांसाठी सुरक्षित अन्न-पाण्याची सोय उपलब्ध झाली.

कार्यक्रमास नगराध्यक्ष भरतशेठ शहा, नगरसेवक अक्षय सूर्यवंशी, माजी नगराध्यक्ष अशोक इजगुडे, माजी नगरसेवक कैलास कदम, अनिकेत वाघ, प्रशांत उंबरे, भागवत घनवट,धरम चंद लोढा, अमोल माने,विशाल रणवरे,पो.ह आप्पासाहेब हेगडे,ग्राम सेवक नंदराज चंदनशिवे तसेच वृक्षप्रेमी सामाजिक संस्थेचे पदाधिकारी, सदस्य आणि विद्या प्रतिष्ठान इंग्लिश मीडियम स्कूलचे शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना भरत शहा यांनी नागरिकांना पर्यावरण संवर्धनासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले. उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी अन्न व पाण्याची व्यवस्था करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच कचरा उघड्यावर न टाकता घंटागाडीत टाकावा, पाण्याचा जपून वापर करावा आणि शहर स्वच्छ, सुंदर व हरित करण्यासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे, असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, वृक्षप्रेमी सामाजिक संस्थेच्या कार्याचे कौतुक करत पुढील पर्यावरणीय व सामाजिक उपक्रमांसाठी इंदापूर नगरपरिषदेकडून आवश्यक ती मदत दिली जाईल, असे आश्वासनही यावेळी देण्यात आले.

# पुणे–सोलापूर हायवेवर सुसाट कंटेनरची एसटीला धडक

## प्रवाशांनी भरलेली बस थेट उलटली, प्रवासी सुखरूप

**पुणे, ता. २० :** काळ आला होता, पण वेळ आली नव्हती, याचा प्रत्यय शुक्रवारी पुणे-सोलापूर महामार्गावर आला. पाटस जवळील हॉटेल कंचन परिसरात एका सुसाट कंटेनरने दिलेल्या धडकेमुळे ४४ प्रवाशांनी भरलेली एसटी बस थेट उलटली. या भीषण अपघातात बसचा अक्षरशः चक्काचूर झाला, मात्र सुदैवाने सर्व प्रवासी सुखरूप आहे.



सोलापूरहून पुण्याच्या दिशेने निघालेली ही बस आपल्या निर्धारित वेगात धावत होती. मात्र, मागून येणाऱ्या एका कंटेनर चालकाने अतिघाईत ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. महामार्गावर सध्या सुरू असलेल्या रुंदीकरणाच्या कामामुळे रस्ता अरुंद झाला आहे, याचा अंदाज कंटेनर चालकाला आला नाही. त्याने बसच्या उजव्या बाजूला जोरदार धडक दिली. हा धक्का इतका तीव्र होता की, चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस रस्त्यावरून खाली घसरत जाऊन पलटी झाली.

अपघाताचा आवाज होताच परिसरातील हॉटेलमधील कर्मचारी आणि ग्रामस्थांनी क्षणाचाही विलंब न लावता बसच्या दिशेने धाव घेतली. बसच्या खिडक्यांच्या काचा फोडून आणि मागील आपत्कालीन दरवाजातून एका-एका प्रवाशाला बाहेर काढण्यात आले. गंभीर जखमी झालेल्या २-३ प्रवाशांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# पूर्व हवेलीत गॅस सिलेंडरचा काळाबाजार बहरात

## व्यावसायिक सिलेंडर ७ हजारांनी विक्री करणाऱ्या टोळीवर कारवाई कधी?

**लोणी काळभोर, ता. २० :** पूर्व हवेली परिसरात व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या काळाबाजाराने पुन्हा डोके वर काढले असून, घरगुती सिलेंडरचा गैरवापर करून चारपट दराने सिलेंडर विक्री करणारी टोळी सक्रीय झाल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. प्रशासन व गॅस कंपन्यांच्या कथित निष्क्रियतेमुळे ही टोळी खुलेआम धंदा करत असल्याचा आरोप स्थानिक नागरिक व व्यावसायिकांकडून केला जात आहे.

पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील हडपसर ते उरुळी कांचन दरम्यान शेकडो मंगल कार्यालये आणि हजारो लहान-मोठी हॉटेल्स आहेत. मार्चच्या सुरुवातीला



व्यावसायिक सिलेंडरची किंमत सुमारे १७०० ते १७३० रुपये होती. मात्र आंतरराष्ट्रीय परिस्थिती आणि पुरवठा विस्कळीत झाल्याच्या पार्श्वभूमीवर शासनाने व्यावसायिक सिलेंडर वितरणावर निर्बंध आणल्याने बाजारात तुटवडा निर्माण झाला. याच परिस्थितीचा गैरफायदा घेत काही दलालांनी काळाबाजाराचे जाळे उभे केल्याचे बोलले जात आहे.

मागील वीस दिवसांपासून पूर्व हवेलीतील काही भागांत व्यावसायिक सिलेंडर ६ ते ७ हजार रुपये दराने विकले जात असल्याची माहिती समोर येत आहे. ही टोळी विशेषतः मंगल कार्यालये, मोठी हॉटेल्स आणि केटरिंग व्यावसायिकांना लक्ष्य करून थेट संपर्क साधत असून मोठ्या दराने सिलेंडरचा पुरवठा करत असल्याचे सांगितले जाते. अधिकृत पुरवठा बंद असतानाही परिसरातील एकही मोठे हॉटेल किंवा मंगल कार्यालय बंद पडलेले नसल्याने काळाबाजार किती मोठ्या प्रमाणात सुरू आहे, याची प्रचिती येत आहे. याहून गंभीर बाब म्हणजे घरगुती सिलेंडरचे व्यावसायिक सिलेंडरमध्ये रूपांतर करून विक्री केली जात असल्याची जोरदार चर्चा आहे. ही प्रक्रिया पूर्णपणे नियमबाह्य असून यामुळे अपघाताचा धोका वाढण्याबरोबरच शासनाच्या अनुदानाचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर होत आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर काळाबाजार सुरू असताना गॅस कंपन्या, पुरवठा विभाग आणि पोलिस प्रशासनाला याची कल्पना नाही का? काहींनी तर या टोळीच्या मागे प्रभावशाली व्यक्तींचा वरदहस्त असल्याचा थेट आरोप केला आहे. पूर्व हवेलीतील सामाजिक व व्यावसायिक संघटनांनी या प्रकरणाचा सखोल तपास करून काळाबाजार करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करावा, तसेच संबंधित गॅस एजन्सी आणि अधिकाऱ्यांचीही चौकशी करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

दरम्यान, प्रशासनाने तातडीने संयुक्त पथक तयार करून गॅस गोदामे, हॉटेल्स आणि मंगल कार्यालयांवर छापे टाकावेत, अन्यथा सर्वसामान्य ग्राहक व लहान व्यावसायिकांवर अन्याय सुरूच राहील, असा इशाराही नागरिकांकडून देण्यात आला आहे.

पुणे प्राईम न्यूज

http://www.puneprimenews.com

# मुख्यमंत्री फडणवीसांच्या आदेशानंतर अखेर रूपाली चाकणकर यांचा राजीनामा

**मुंबई, ता. २१ :** अंकशास्त्राच्या आधारे भविष्य सांगण्याचा दावा करणाऱ्या नाशिकमधील अशोक खरातला बलात्काराच्या आरोपाखाली अटक झाली आहे. याच अशोक खरातची पाद्यपूजा करताना रुपाली चाकणकरांचे काही फोटो समोर आले होते. त्यामुळे रुपाली चाकणकरांनी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी विरोधकांनी केली होती. या प्रकरणावरून विरोधकांनी रुपाली चाकणकर यांच्यावर टीकेची झोड उठवली होती.

या सर्व घडामोडीनंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रुपाली चाकणकर यांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानंतर अखेर रुपाली चाकणकर यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. रुपाली चाकणकर यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे सोपवला असल्याचं सांगण्यात येत आहे.



कशास्त्राच्या आधारे भविष्य सांगण्याचा दावा करणाऱ्या नाशिकमधील अशोक खरातला बलात्काराच्या आरोपाखाली अटक झाली आहे. याच अशोक खरातची पाद्यपूजा करताना रुपाली चाकणकरांचे काही फोटो समोर आले होते. त्यामुळे रुपाली चाकणकरांनी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी विरोधकांनी केली होती. या प्रकरणावरून विरोधकांनी रुपाली चाकणकर यांच्यावर टीकेची झोड उठवली होती. या सर्व घडामोडीनंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रुपाली चाकणकर यांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानंतर अखेर रुपाली चाकणकर यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. रुपाली चाकणकर यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे सोपवला असल्याचं सांगण्यात येत आहे.

मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्याचा दावा राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याच्या आधी रुपाली चाकणकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याचा दावा त्यांनी केला आहे. याबाबत एक्सवर एक पोस्ट शेअर करत रुपाली चाकणकर यांनी म्हटलं की, आज मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या पत्रात अशोक खरात महिला अत्याचार प्रकरणाचा सखोल व वस्तुनिष्ठ तपास व्हावा तसेच या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करत या प्रकरणातील सत्यता बाहेर यावी व आरोपीवर कठोर कारवाई व्हावी याबाबत त्यांना राज्य महिला आयोगाच्यावतीने पत्र दिले, असं रुपाली चाकणकर यांनी म्हटलं आहे.

## किम जोंग उन यांचा ९९.९३ मतांनी विजय

**नवी दिल्ली, ता. २० :** उत्तर कोरियाचे नेते किम जोंग उन यांनी देशात नुकत्याच झालेल्या संसदीय निवडणुकीत पुन्हा एकदा दणदणीत विजय मिळवला आहे. त्यांच्या वर्कर्स पार्टी ऑफ कोरिया आणि मित्रपक्षांना ९९.९३ टक्के मते मिळाली आहेत. १५ मार्च रोजी १५ व्या सुप्रीम पीपल्स असेंब्लीच्या सदस्यांची निवड करण्यासाठी ही निवडणूक पार पडली. उत्तर कोरियाच्या सरकारी वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, सत्ताधारी गटाने पाठिंबा दिलेले सर्व उमेदवार या निवडणुकीत विजयी झाले आहेत. अधिकृत आकडेवारीनुसार, ९९.९३ टक्के लोकांनी किम यांच्या पक्षाच्या बाजूने मतदान केले. मात्र, सरकारी प्रसारमाध्यमांनी हे प्रमाण ९९.९७ टक्के असल्याचे सांगितले असून मतदानाची टक्केवारी आश्चर्यकारक ९९.९९ टक्के इतकी नोंदवण्यात आली आहे. परदेशात किंवा समुद्रात कामावर असल्यामुळे ०.३७ टक्के नोंदणीकृत मतदार मतदान करू शकले नाहीत, तर ०.३ टक्क्यांहून कमी मतदारांनी मतदानाकडे पाठ फिरवली.

## संक्षिप्त



### रुपाली चाकणकर फरार; रुपाली पाटील-ठोंबरेंच्या पोस्टने खळबळ

**पुणे, ता. २० :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रूपाली चाकणकर यांनी अशोक खरातच्या पाद्यपूजेचा व्हिडीओ समोर आला. तसेच अशोक खरात आणि रुपाली चाकणकर यांचे विविध कार्यक्रमातील फोटोही समोर आल्यानंतर त्यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. याचदरम्यान, रुपाली चाकणकरांच्याच पक्षातील नेत्या रुपाली पाटील-ठोंबरे यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टची चर्चा रंगली आहे. राज्य महिला आयोगाच्या रुपाली चाकणकर फरारबजाव तालीअशी पोस्ट रुपाली पाटील यांनी केली आहे. रुपाली पाटलांच्या या पोस्टमुळे एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, अशोक खरात प्रकरणी काल रुपाली पाटील-ठोंबरे यांनी पत्रकार परिषद घेत रुपाली चाकणकरांच्या राजीनाम्याची मागणी देखील केली होती. नाशिकमधील विषय कोणत्या पक्षाचा, जातीचा नाही हा महिलांचा आहे. खरंच ट्रस्टवर राज्य महिला आयोग अध्यक्ष रूपाली चाकणकर आहेत. त्यामुळे पोलीस कारवाई करत नव्हते का? ५८ व्हिडीओ आहेत म्हणजे ५८ महिलांवर अत्याचार झाला आहे का? रुपाली चाकणकर राज्य महिला आयोग अध्यक्षपदावरुन पायउतार झाल्या पाहिजे. त्याशिवाय तपास पूर्ण होणार नाही. असं म्हटलंय.



### अवकाळी पावसाने राज्याला झोडपलं

**पुणे, ता. २० :** राज्यात उन्हाचा कडाका कमी होऊन पावसाला पोषक वातावरण निर्माण झालं आहे. गेले काही दिवस मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात पावसाने चांगलाच जोर धरला आहे. जालना, वाशीम, नाशिक, पुणे येथे वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. तसेच बहुतांश भागात गारपीट झाली. शनिवारी मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भाच्या दक्षिणेकडील जिल्ह्यांत वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता असल्याने येलो अलर्ट देण्यात आला. उर्वरित राज्यात तुरळक ठिकाणी विजांसह हलक्या पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे, मेघगर्जना, विजांसह वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज असल्याने येलो अलर्ट देण्यात आला आहे. रम्यान काल झालेल्या पावसाने राज्याला चांगलेच झोडपले. याचा फटका हंगामी फळांना आणि भाज्यांना बसला आहे. हातातोंडाशी आलेला घास अवकाळी पावसामुळे वाया गेल्याने बळीराजा हवालदिल झाला आहे.

### युद्धाने अमेरिकेवरील कर्जाचा बोजा वाढला

**नवी दिल्ली, ता. २० :** इराण युद्ध सुरू होऊन जेमतेम तीन आठवडेही होत नाहीत तोवरच अमेरिकेवरील आर्थिक दबाव वाढत चालल्याचं दिसून येतंय. जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेल्या अमेरिकेचं कर्ज झपाट्याने वाढतंय. अमेरिकेवरचं एकूण कर्ज ३९ ट्रिलियनडॉलर्सपेक्षा जास्त असल्याची माहिती आहे. फक्त दोन महिन्यांपूर्वी हे कर्ज सुमारे ३७ ट्रिलियन डॉलर्सच्या आसपास होतं. आता युद्ध सुरू झाल्यानंतर त्यामध्ये मोठी भर पडल्याचं दिसतंय. काही तज्ज्ञांच्या मते, अमेरिकेवरील कर्जाचा हा आकडा लवकरच ४० ट्रिलियन डॉलर्सच्या दिशेने जाऊ शकतो. मात्र या कर्जसंकटात अमेरिकेचा संरक्षण विभाग पेंटागनकडून एक मोठी मागणी समोर आली आहे. पेंटागनने अमेरिकन संसदेपुढे युद्धसज्जता आणि शस्त्रनिर्मितीसाठी सुमारे २०० अब्ज डॉलर्सची मागणी केली आहे. त्यामुळे आता अमेरिकेची संसद नेमकी काय निर्णय घेते हे पाहावं लागेल.

### वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा

**पुणे, ता. २१ :** राज्यात उन्हाचा कडाका कमी झाला असून, हवेत कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने पावसाला पोषक वातावरण तयार झाले आहे. पुढील चार दिवस राज्यात हे पावसाळी वातावरण कायम राहणार आहे.आज दक्षिण मराठवाड्यातील धाराशिव, लातूर, नांदेड, तसेच विदर्भातील नागपूर, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांत वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता असल्याने हवामान विभागाने येलो अलर्ट दिला आहे. येथे ताशी ३० ते ४० किमी वेगाने वारे वाहतील. दरम्यान, या अवकाळी पावसामुळे बळीराजा मोठ्या संकटात सापडला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा तालुक्यात वादळी पावसामुळे मक्याचे उभे पीक आडवे झाले आहे. आधीच वाढत्या खर्चामुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांवर या अवकाळी पावसाने आणखी संकट ओढवले आहे.

# माळेगाव बुद्रुकमध्ये कंत्राटदारावर प्राणघातक हल्ला; अज्ञातांविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा

**बारामती, ता. २० :** बारामती तालुक्यातील माळेगाव बुद्रुक येथे एका कंत्राटदारावर पाच अज्ञात इसमांनी प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. भरदिवसा झालेल्या या हल्ल्यात कंत्राटदाराला जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला असून, याप्रकरणी माळेगाव पोलीस ठाण्यात पाच अज्ञात आरोपींविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



ही घटना माळेगाव बुद्रुक (ता. बारामती) गावच्या हद्दीतील बास्केट बाजारसमोरील मोकळ्या जागेत बुधवारी (ता. १८) सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास घडली. दिलीप धनसिंग जगताप (वय ५२, व्यवसाय शेती व कंत्राटदार, रा. धुमाळवाडी, ता. बारामती, जि. पुणे, सध्या रा. प्लॉट नं. जी, लक्ष्मी नारायण नगर, कसबा-३, ता. बारामती) असे मारहाण झालेल्या कंत्राटदाराचे नाव आहे. याप्रकरणी जगताप यांनी माळेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी दिलीप जगताप हे शेतीसह कंत्राटदार म्हणून व्यवसाय करतात. बुधवारी सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास ते माळेगाव बुद्रुक येथील बास्केट बाजारसमोरील मोकळ्या जागेत गेले होते. त्यावेळी २५ ते ३० वयोगटातील पाच अनोळखी तरुण तेथे आले. आरोपींनी संगनमत करून दिलीप जगताप यांना गाठले.

आमचे पैसे का देत नाही? असा जाब विचारत आरोपींनी त्यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर टोळक्याने त्यांना घेरून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी दगड आणि लाकडी काठ्यांनी त्यांच्या डोक्यावर जोरदार प्रहार करण्यात आले. फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, हा हल्ला त्यांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशानेच करण्यात आला होता. दिलीप जगताप यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बारामती तालुका पोलिसांनी पाच अज्ञात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०९ (१) (खुनाचा प्रयत्न), १८९ (२), १९०, १९१ (१), १९१ (२), १९१ (३), ३ (५) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक खटावकर करत आहेत.

## लोणी काळभोर येथील राघव थापा नवोदय परीक्षेत यशस्वी

**लोणी काळभोर, ता. २० :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित लोणी काळभोर (ता. हवेली) येथील इंग्लिश मीडियम स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी जवाहर नवोदय विद्यालय निवड परीक्षेत सलग दुसऱ्या वर्षी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या या परीक्षेत शाळेच्या इयत्ता पाचवीतील एकूण १५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या परीक्षेत विद्यार्थी राघव सुरेश थापा याने ९६.२५ टक्के गुण मिळवून जवाहर नवोदय विद्यालयात प्रवेश निश्चित केला आहे. त्याच्या या उल्लेखनीय यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून सर्व स्तरातून त्याचे कौतुक होत आहे.

ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार या शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांना साजेसा शैक्षणिक दर्जा राखत शाळेने हे यश मिळवले असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले. शाळेच्या प्राचार्या पौर्णिमा शेवाळे तसेच सहसचिव प्रशासन एस. एम. गवळी यांनी यशस्वी विद्यार्थ्याचे अभिनंदन करून शिक्षक, समन्वयक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शनाचे कौतुक केले. दरम्यान, या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना कविता कोरे यांनी विशेष मार्गदर्शन केले होते. तसेच पालकांचेही महत्त्वपूर्ण सहकार्य लाभल्याचे शाळेच्या वतीने नमूद करण्यात आले. यशस्वी विद्यार्थी व त्याला मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे परिसरातून हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.

# एटीएममधून पैसे काढणे १ एप्रिलपासून महागणार

**पुणे, ता. २० :** नवे आर्थिक वर्ष (२०२६-२७) सुरू होताच सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक नियोजनावर परिणाम करणारे मोठे बदल बँकिंग क्षेत्रात होत आहेत. १ एप्रिलपासून बँकिंग व्यवहारांचे गणित बदलणार असून, विशेषतः एटीएम आणि UPI द्वारे पैसे काढणाऱ्या ग्राहकांसाठी ही धोक्याची घंटा ठरू शकते.



आतापर्यंत अनेक बँकांमध्ये एटीएममधून कार्ड न वापरता केवळ 'UPI QR कोड' स्कॅन करून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध होती. अनेक ग्राहक या सुविधेचा वापर 'फ्री ट्रान्झॅक्शन'च्या मर्यादेबाहेरचे व्यवहार म्हणून करत होते. मात्र, बँकांनी आता या पळवाटेला लगाम घातला आहे. १ एप्रिलपासून तुम्ही UPI द्वारे एटीएममधून काढलेले पैसे देखील तुमच्या महिन्याच्या ठराविक 'फ्री लिमिट'मध्येच मोजले जातील. सोप्या भाषेत सांगायचे तर, कार्डने पैसे काढा किंवा UPI ने, तुमचे मोफत व्यवहारांचा कोटा आता एकत्रितपणे मोजला जाणार आहे.

प्रत्येक जास्तीच्या व्यवहारासाठी तुम्हाला सुमारे २३ रुपये (करासह) अतिरिक्त मोजावे लागतील. जे ग्राहक छोट्या रकमांसाठी वारंवार एटीएमचा वापर करतात, त्यांची ही मर्यादा महिन्याच्या पहिल्या १०-१५ दिवसांतच संपण्याची शक्यता आहे. परिणामी, महिन्याच्या अखेरीस होणाऱ्या प्रत्येक विड्रॉलवर भुर्दंड सोसावा लागेल. जर तुम्हाला अतिरिक्त चार्जेस टाळायचे असतील, तर एकाच वेळी मोठी रक्कम काढणे फायदेशीर ठरेल. वारंवार १००-२०० रुपये काढण्याऐवजी महिन्याचे रोख रकमेचे नियोजन करून एकदाच विड्रोल करा. तसेच, शक्य असेल तिथे थेट दुकानदाराला UPI ने पेमेंट करा, जेणेकरून एटीएममध्ये जाण्याची गरज पडणार नाही.

# मला संपवायला महाराष्ट्रातील बड्या नेत्यांनी प्रयत्न केला

## पण परळीच्या जनतेने माझ्यावर विश्वास दाखवला : धनंजय मुंडे

**बीड, २० :** बीड जिल्ह्यातील परळी येथे झालेल्या एका कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धनंजय मुंडे यांनी केलेल्या वक्तव्यामुळे स्थानिक राजकारण पुन्हा तापले आहे. नगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मला जाणीवपूर्वक बदनाम करण्याचा प्रयत्न झाला असा आरोप त्यांनी करत अप्रत्यक्षपणे विरोधकांवर निशाणा साधला.



मागील काही महिन्यांत धनंजय मुंडे यांच्यावर विविध प्रकरणांमुळे सतत टीका होत होती. विशेषतः वाल्मिक कराड प्रकरण आणि कृषी खात्याशी संबंधित मुद्द्यांवरून त्यांना राजकीय दबावाचा सामना करावा लागला. या वादळात त्यांना मंत्रिपद आणि पालकमंत्रिपद सोडावे लागले, त्यामुळे त्यांच्या राजकीय प्रतिमेवर मोठा परिणाम झाला होता. याच पार्श्वभूमीवर त्यांनी आता थेट प्रतिक्रिया दिली आहे.

मुंडे म्हणाले की, नगरपालिका निवडणुकीच्या काळात राज्यभर राजकीय वातावरण होते, पण मी वेगळ्याच संघर्षातून जात होतो. मला संपवण्यासाठी मोठ्या नेत्यांनी एकत्रित प्रयत्न केले. त्यांच्या या विधानामुळे ते नेमके कुणाकडे बोट दाखवत आहेत, याबाबत चर्चा सुरू झाली आहे. त्याच वेळी त्यांनी परळीतील जनतेचे आभार मानत, कठीण परिस्थितीतही महायुतीला मिळालेला पाठिंबा अधोरेखित केला. इतक्या विरोधातही जनतेने आमच्या पाठीशी उभे राहून ऐतिहासिक विजय मिळवून दिला, असे ते म्हणाले.

दरम्यान, या प्रकरणाला आणखी एक संदर्भ म्हणजे भाजप आमदार सुरेश धस यांनी पूर्वी केलेले आरोप. त्यांच्या टीकेनंतरच मुंडे यांच्यावरचा दबाव वाढला होता. त्यामुळे मुंडेंचे सध्याचे वक्तव्य हे केवळ भावनिक प्रतिक्रिया नसून आगामी निवडणुकांच्या दृष्टीने राजकीय संदेश मानला जात आहे.

# रुपाली चाकणकरांना राजीनामा द्यावाच लागेल : संजय राऊत

**नाशिक, ता. २० :** नाशिकमधील कथित भोंदू ज्योतिष अशोक खरात याच्या अटकेनंतर आता महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणाचे धागेदोरे थेट राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यापर्यंत पोहोचल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. खरातसोबतचे चाकणकर यांचे काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने खळबळ उडाली असून, यावरून शिवसेना खासदार संजय राऊत यांनी चाकणकर यांना राजीनामा द्यावाच लागेल असे म्हंटले आहे.



काही दिवसांपूर्वी नाशिकमध्ये अशोक खरात नावाच्या एका व्यक्तीला फसवणुकीच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. अटकेनंतर त्याचे अनेक बड्या राजकीय नेत्यांसोबतचे फोटो समोर आले आहेत. यात रुपाली चाकणकर यांचाही समावेश असल्याने विरोधकांनी सत्ताधारी पक्षाला घेरण्याची संधी सोडलेली नाही. खासदार संजय राऊत यांनी या प्रकरणावर अत्यंत कडक शब्दांत टीका केली आहे. रुपाली चाकणकर या एका स्वायत्त संस्थेच्या (महिला आयोग) अध्यक्षा असल्या, तरी त्यांची नियुक्ती सरकारनेच केली आहे. जर आता सरकार त्यांना या पदावरून हटवण्याची शिफारस का करत नाही? असा सवाल राऊतांनी उपस्थित केला आहे. चाकणकर यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा, अशी ठाम भूमिका राऊतांनी मांडली आहे.

# कबुतरांच्या वादातून झालेल्या खुनाचा छडा; चार आरोपी जेरबंद, गुन्हे शाखेची कामगिरी

**पुणे, ता. २० :** हडपसर परिसरात कबुतरांच्या कारणावरून झालेल्या खुनाच्या घटनेचा पुणे शहर गुन्हे शाखेच्या खंडणीविरोधीपथक२ने अवघ्या काही तासांत छडा लावून चार आरोपींना अटक केली आहे. या जलद कारवाईमुळे पोलिसांच्या तपास कौशल्याचे पुन्हा एकदा दर्शन घडले आहे.



गौरव विजयकुमार माजी (वय २२), सचिन विजय कुमार माजी (वय-२३), मोनू विजयकुमार माजी (वय-२६) व बंटी विजयकुमार माजी (वय-१८, सर्व रा. शंकरमठ, हडपसर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. रुपेश शिंदे (वय-१९) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १८ मार्च २०२६ रोजी पहाटे पवार इन्क्लेव्ह सोसायटी, शंकरमठ, हडपसर परिसरात कबुतरांच्या ढाबळीजवळ उभ्या असलेल्या रुपेश शिंदेला संशयावरून पाच जणांनी लाकडी बॅट तसेच लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या मारहाणीमध्ये तो गंभीर जखमी झाला आणि पुढे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

या घटनेची माहिती मिळताच खंडणी विरोधी पथक२ चे अंमलदार नितीन मुंढे यांनी वरिष्ठ अधिकारी पोलीस निरीक्षक राम राजमाने यांना तात्काळ कळविले. त्यांच्या सूचनेनुसार पोलीस हवालदार राऊत व रोकडे यांनी तत्काळ ससून रुग्णालयात धाव घेऊन चौकशी केली. तेथे मिळालेल्या संशयितांकडून कसून चौकशी केल्यानंतर संपूर्ण प्रकार उघडकीस आला.

चौकशीत आरोपींनी कबुतरे चोरीला जाण्याच्या संशयातून तरुणावर हल्ला केल्याची कबुली दिली. त्यानुसार वानवडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या संबंधित कलमांनुसार खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी तातडीने कारवाई करत चौघांना बेड्या ठोकल्या आहेत. या जलद व अचूक कारवाईबद्दल पोलिसांच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. ही कारवाई पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहआयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त पोलीस आयुक्त पंकज देशमुख, तसेच गुन्हे शाखेचे उपायुक्त निखील पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथक२ चे पोलीस निरीक्षक राम राजमाने, पोलीस उपनिरीक्षक गौरव देव, तसेच अंमलदार नितीन मुंढे, कारखेले, रोकडे आणि राऊत यांच्या पथकाने केली आहे.

# गॅस सिलिंडरच्या टंचाईमुळे कामगारांचे गावाकडे पलायन



**गुजरात, ता. २० :** करोना काळातील लॉकडाऊननंतर आता पुन्हा एकदा स्थलांतरित कामगारांवर गावाकडे परतण्याची वेळ आली आहे. इराण-इस्रायल युद्धामुळे निर्माण झालेल्या ऊर्जा संकटाचा परिणाम गुजरातमधील सूरत शहरावर दिसू लागला असून एलपीजी गॅस सिलिंडरच्या वाढत्या दरांमुळे अनेक कामगार शहर सोडत आहेत.

सूरतमधील टेक्स्टाईल उद्योगात उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड आणि ओडिशामधील हजारो कामगार कार्यरत आहेत. मात्र गॅस सिलिंडरचा खर्च परवडत नसल्याने अनेक कुटुंबांनी परतीचा निर्णय घेतला आहे. उधना जंक्शन रेल्वे स्थानकावर गेल्या काही दिवसांपासून कामगारांची मोठी गर्दी दिसत आहे.

डायिंग-प्रिंटिंग मिलमध्ये काम करणारे सुभाष ठाकूर यांनी सांगितले की, पूर्वी ५ किलोचा सिलिंडर सुमारे ५०० रुपयांत मिळत होता, मात्र आता त्याच रिफिलचा दर २५०० रुपयांपर्यंत पोहोचल्याने कुटुंबाचा खर्च भागवणे अशक्य झाले आहे. कामगारांच्या पलायनामुळे सूरतच्या वस्त्रोद्योगासमोर मनुष्यबळाचे संकट उभे राहिले असून काही कारखाने आठवड्यातून एक-दोन दिवस बंद ठेवावे लागत आहेत.

दरम्यान, परिस्थिती हाताळण्यासाठी दक्षिण गुजरात वस्त्र प्रक्रिया संघटनेने पांदेसरा येथे सामुदायिक स्वयंपाकघर सुरू केले असून ४०-४५ रुपयांत जेवण उपलब्ध केले जात आहे. येथे दररोज सुमारे ५ हजार कामगारांसाठी अन्न तयार केले जाते.

# महाराष्ट्रावर आज ११ लाख कोटींचे कर्ज; शिवतीर्थावरून राज ठाकरेंचा हल्लाबोल

**मुंबई, ता. २० :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या गुढीपाडवा मेळाव्यात पक्षप्रमुख राज ठाकरे यांनी केलेले भाषण हे केवळ राजकीय टीकेपुरते मर्यादित न राहता राज्य आणि देशासमोरील व्यापक प्रश्नांवर भाष्य करणारे ठरले. पक्ष स्थापनेला २० वर्ष पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना भविष्यकालीन राजकीय दिशेचे संकेतही दिले.

राज ठाकरे यांनी ९ मार्च २००६ रोजी पक्षाची स्थापना आणि १९ मार्च २००६ रोजी झालेल्या पहिल्या सभेचा उल्लेख करत, आज २० वर्षांनंतर पुन्हा त्याच दिवशी गुढीपाडवा येणं हा शुभ संकेत असल्याचे सांगितले. या संदर्भातून त्यांनी मनसे पुन्हा उभारी घेणार असल्याचा आत्मविश्वास व्यक्त केला. त्यांच्या भाषणाचा केंद्रबिंदू केवळ पक्षवाढ नव्हता, तर महाराष्ट्राच्या सध्याच्या स्थितीबद्दलची चिंता होती.

राज ठाकरे यांनी राज्यातील आर्थिक स्थितीवर थेट बोट ठेवत सांगितले की, महाराष्ट्रावर सुमारे ११ लाख कोटींचे कर्ज झाले आहे. २०१४ च्या तुलनेत कर्जात झालेली प्रचंड वाढ ही विकासाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उभे करते, असे त्यांनी सूचित केले. शहरांमधील वाहतूक कोंडी, अनियंत्रित बांधकामे आणि नियोजनाचा अभाव यामुळे शहरी जीवनमान खालावत असल्याचा मुद्दाही त्यांनी ठळकपणे मांडला. पिझ्झा १० मिनिटांत येतो, पण माणूस १० मिनिटांत कुठे पोहोचू शकत नाही, या उदाहरणातून त्यांनी व्यवस्थेतील विसंगती अधोरेखित



केली. याचबरोबर ग्रामीण भागातील प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचे त्यांनी नमूद केले. शेतकरी कर्जमाफी तीन वेळा झाली, तरी आत्महत्यांचे प्रमाण कमी झालेले नाही, हा गंभीर मुद्दा त्यांनी उपस्थित केला. ग्रामीण युवक शेतीकडे पाठ फिरवत शहरांकडे धावत आहेत, पण शहरांमध्येही त्यांना अपेक्षित संधी आणि जीवनमान मिळत नसल्याची वस्तुस्थिती त्यांनी मांडली.

आंतरराष्ट्रीय घडामोडींवर बोलताना त्यांनी मध्य पूर्वेतील तणाव आणि त्याचा भारतावर होणारा परिणाम अधोरेखित केला. विशेषतः ऊर्जा संकट आणि गॅस टंचाई याकडे लक्ष वेधत भारताने इराणसारख्या पारंपरिक मित्र देशाला योग्य साथ दिली नाही, असा आरोप त्यांनी केंद्र सरकारवर केला. यामागे ऊर्जा सुरक्षेचा मुद्दा दडलेला असल्याचे त्यांनी सूचित केले.

राज ठाकरे यांनी सामाजिक पातळीवरही गंभीर मुद्दे उपस्थित केले. समाजातील तरुण पिढी मोबाईल आणि सोशल मीडियामध्ये गुंतून पडत असल्याने प्रश्न विचारण्याची सवय कमी होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. मनोरंजनाच्या आहारी जाऊन लोक वास्तवापासून दूर जात आहेत, असे ते म्हणाले. यामुळे लोकशाहीत सक्रिय सहभाग कमी होण्याचा धोका त्यांनी अधोरेखित केला.

भाषा आणि ओळख या मुद्द्यावर त्यांनी विशेष भर दिला. मराठी भाषा आणि संस्कृती धोक्यात असल्याचा इशारा देत, भाषा गेली की ओळख जाते, असे स्पष्ट शब्दांत त्यांनी सांगितले. राज्यातील वाढती स्थलांतराची समस्या, अनियंत्रित शहरीकरण आणि स्थानिकांच्या संधींवर होणारा परिणाम याकडे त्यांनी लक्ष वेधले.

दरम्यान, या संपूर्ण भाषणातून राज ठाकरे यांनी एकाच वेळी राजकीय, सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांचा वेध घेतला. हे भाषण केवळ टीका नसून, आगामी काळात मनसे स्वतःला कशा प्रकारे मांडणार आहे याचे संकेत देणारे ठरते. महाराष्ट्रातील बदलत्या राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर हे भाषण महत्त्वाचे मानले जात आहे.

# अजित पवारांना संपवण्याचा कट?; कॅप्टन खरातवर अमोल मिटकरींचा आरोप



**पुणे, ता. २० :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत सुरू असलेल्या चर्चेला आता नवे वळण मिळाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी नाशिकमधील भोंदू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अशोक खरात याचा या अपघाताशी काही संबंध आहे का, याची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

अजित पवार यांच्या अपघातानंतर सुरुवातीपासूनच विविध शंका उपस्थित होत आहेत. विमान कंपनी, तांत्रिक बिघाड आणि संभाव्य घातपात या सर्व अँगलने तपास व्हावा, अशी मागणी आधीपासून होत आहे. त्यातच आता अशोक खरात प्रकरण समोर आल्यानंतर या चर्चेला आणखी धार आली आहे.

अमोल मिटकरी यांनी सोशल मीडियावर काही फोटो शेअर करत दावा केला आहे की, अशोक खरात हा संबंधित विमान कंपनीच्या पायलटसोबत आणि विमानासमोर दिसत आहे. यामुळे दोघांमध्ये काही संबंध होते का, याबाबत संशय व्यक्त केला जात आहे. तसेच काही ठिकाणी जादूटोणा करण्याचे प्रयत्न झाल्याच्या चर्चाही पुढे आल्या असून, त्याचा या प्रकरणाशी काही संबंध आहे का, असा सवालही उपस्थित केला जात आहे.

मिटकरी यांनी स्पष्ट केले की, अशा अंधश्रद्धांवर त्यांचा किंवा अजित पवारांचा विश्वास नव्हता. मात्र, जर या सर्व घटनांमध्ये काही दुवे असतील आणि ते विमान कंपनीपर्यंत पोहोचत असतील, तर संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास होणे आवश्यक आहे.

या मागणीमुळे आधीच संवेदनशील असलेल्या या प्रकरणाला राजकीय रंग मिळण्याची शक्यता आहे. अपघातामागील नेमकी कारणे शोधण्यासाठी तपास यंत्रणांवर दबाव वाढत असून, सर्व अँगलने निष्पक्ष चौकशी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# इन्स्टाग्राममधून बाहेर पडा; गुढीपाडवा मेळाव्यात राज ठाकरेंचं मुद्द्यांवर बोट

**मुंबई, ता. २० :** मराठी नववर्षानिमित्त मुंबईत मनसेचा गुढीपाडवा मेळावा संपन्न झाला. यावेळी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महाराष्ट्राची आजची परिस्थिती आणि त्याची कारणं, यावर भाष्य केलं. विशेष म्हणजे त्यांनी संपूर्ण भाषणामध्ये इन्स्टाग्रामवरुन लांब राहण्याचा सर्वांना सल्ला दिला.

यावेळी राज ठाकरे म्हणाले, आपल्याला आज करमणुकीमध्ये गुंतवून ठेवलं आहे. आयपीएल, कुठले तरी पिक्चर आणि इतर माध्यमातून गुंतवून ठेवलं जातंय. त्यामुळे पहिल्यांदा इन्स्टाग्राममधून बाहेर पडा. तुम्ही गुंतवून राहिला तर सरकारला प्रश्न विचारू नये यासाठी हे सगळं आखलेलं आहे. हे फक्त भारतात नव्हे तर जगभरात सुरू आहे. सर्वसामान्य




माणसांनी मोबाईल मध्ये, करमणुकी मध्ये अडकून राहावं, मग कुणीही विचार करणार नाही. पूर्वी लोक रस्त्यावर यायचे, पण आता मोबाईलवर निषेध व्यक्त केला जात आहे. माध्यमांची वाट लावून टाकली आहे. सरकारला विरोध केला तर जाहिराती बंद करू अशी धमकी दिली जाते. या अशा विचित्र परिस्थितीमध्ये देश अडकला आहे. असं ते म्हणाले.

नियोजनबद्ध विकास थांबला.! राज्यातील विकास, बेरोजगारी, वाढती वाहतूक कोंडी आणि बिघडलेले शहर नियोजन या मुद्द्यांवर त्यांनी सरकारला धारेवर धरले. शहरांची सध्याची अवस्था चिंताजनक असल्याचे सांगताना ठाकरे म्हणाले की, शहरांचा नियोजनबद्ध विकास थांबला असून कुठेही अनियंत्रित बांधकामे सुरू आहेत. इमारतींना परवानग्या देताना कोणतेही ठोस नियोजन दिसत नसल्याची टीकाही त्यांनी केली.

**खामेनेई यांच्या बद्दल राज ठाकरे काय म्हणाले?**

जो इराण देश इतकी वर्षे आपल्याला साथ देत होता, त्या इराणवर ज्या प्रकारे हल्ले होत आहेत तेव्हा आपण इराणला साथ द्यायला पाहिजे होती. देशात येणारे बरंचसं तेल इराणमधून येतं, ते आपल्या रुपयामध्ये तेलविक्री करतात.

खामेनेई गेल्यानंतरही आपल्या देशाच्या पंतप्रधानांनी निषेधाचं स्टेटमेंट केलं नाही की हल्ल्यावर स्टेटमेंट केलं नाही. जो देश जम्मू-काश्मीरच्या प्रश्नावरही भारताला पाठिंबा देतो, त्या देशाच्या मागे आपण उभे राहिलो नाही याचा त्रास भविष्यात आपल्यालाच होणार आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## आवडीने खा पण प्रकृतीचीही काळजी घ्या!

सध्या सणासुदीचे दिवस सुरू आहेत. भारतीय परंपरेत गोडधोड आणि तळलेले पदार्थ (उदा. पुरणपोळी, भजी, वडे) यांच्याशिवाय सण पूर्ण होत नाही. मात्र, या आनंदाच्या ओघात अनेकदा आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. अति तेलकट आणि साखरेचे पदार्थ खाल्ल्याने पचन बिघडणे, पित्त वाढणे आणि वजन वाढणे अशा समस्या उद्भवतात. म्हणूनच, सणाचा आनंद घेताना आरोग्य कसे जपावे, यासाठी महत्त्वाच्या टिप्स दिल्या आहेत.

'पोर्शन कंट्रोल' सर्वात महत्त्वाचे

सण आहे म्हणून ताट भरून खाण्यापेक्षा प्रत्येक पदार्थाची चव घेण्यावर भर द्या. अति खाण्यामुळे सुस्ती येते आणि रक्तातील साखरेची पातळी अचानक वाढू शकते. जेवताना लहान ताट वापरल्यास आपण कमी प्रमाणात पदार्थ घेतो, असे मानसशास्त्र सांगते.

भरपूर पाणी प्या

तेलकट पदार्थ खाल्ल्यानंतर शरीराला हायड्रेटेड ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. दिवसभरातून किमान ३ ते ४ लिटर पाणी प्या. शक्य असल्यास कोमट पाणी पिणे अधिक फायदेशीर ठरते, कारण ते अन्नातील चरबी पचवण्यास मदत करते.

आहारात फायबरचा समावेश करा

केवळ गोड आणि तळलेले पदार्थ न खाता, ताटात सॅलड, काकडी किंवा गाजर यांचा समावेश करा. फायबरयुक्त पदार्थ खाल्ल्याने पोट लवकर भरल्यासारखे वाटते आणि तेलकट पदार्थांचे दुष्परिणाम कमी होतात.

शारीरिक हालचाल आवश्यक

सणादिवशी खूप काम असते, पण तरीही किमान १५-२० मिनिटे चालायला विसरू नका. जेवणानंतर लगेच झोपण्याऐवजी शतपावली करणे पचनासाठी उत्तम ठरते.

तेलाचा पुनर्वापर टाळा

घरी पदार्थ तळताना एकदा वापरलेले तेल पुन्हा पुन्हा वापरू नका. पुन्हा गरम केलेल्या तेलामुळे शरीरात 'ट्रान्स फॅट्स' वाढतात, जे हृदयासाठी घातक ठरू शकतात.


जर तुम्हाला मधुमेह किंवा उच्च रक्तदाबाचा त्रास असेल, तर अधिक काळजी घ्या. अति तेलकट खाल्ल्यानंतर लिंबू पाणी किंवा ताकाचे सेवन करणे पचनासाठी फायदेशीर ठरू शकते.

# ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्तीला हायकोर्टाचा लगाम

## नियुक्त प्रशासकांना मोठे धोरणात्मक व आर्थिक निर्णय घेण्यास मनाई

**पुणे, ता. २० :** कार्यकाळ संपलेल्या ग्रामपंचायतींवर राजकीय नियुक्त्यांचा डाव रचणाऱ्या राज्य सरकारला मुंबई उच्च न्यायालयाने मोठा धक्का दिला आहे. सरपंचांनाच 'प्रशासक' म्हणून नियुक्त करण्याच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी करताना न्यायालयाने अशा नियुक्त प्रशासकांना कोणतेही मोठे धोरणात्मक किंवा आर्थिक निर्णय घेण्यास कडक मनाई केली आहे. या निर्णयामुळे सत्ताधारी गोटात चिंतेचे वातावरण पसरले असून विरोधकांच्या हाती आयते कोलीत मिळाले आहे.

राज्यातील सुमारे १४ हजार ५०० ग्रामपंचायतींचा कार्यकाळ डिसेंबर २०२५ आणि जानेवारी २०२६ मध्ये संपुष्टात आला आहे. निवडणुका लांबणीवर पडल्याने राज्य सरकारने २०




फेब्रुवारी रोजी एक शासन निर्णय काढून, विद्यमान सरपंचांनाच पुढील सहा महिने किंवा निवडणूक होईपर्यंत 'प्रशासक' म्हणून काम पाहण्याचे अधिकार दिले होते. सरकारच्या या 'राजकीय सोयीच्या' निर्णयाला उच्च न्यायालयात विविध याचिकांद्वारे आव्हान देण्यात आले होते.

औरंगाबाद, नागपूर आणि कोल्हापूर खंडपीठातील सर्व याचिका आता मुंबई उच्च न्यायालयात वर्ग करण्यात आल्या आहेत. न्यायालयाच्या या भूमिकेमुळे राज्यातील १४ हजार ५०० ग्रामपंचायतींमधील सरपंचांचे पंख कापले गेले आहेत. लोकांनी निवडून दिलेला कार्यकाळ संपल्यानंतर त्यांना पुन्हा सत्तेत बसवणे लोकशाहीच्या तत्त्वाविरुद्ध आहे, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांनी केला होता, ज्याची दखल न्यायालयाने घेतली आहे.

न्या. रवींद्र घुगे आणि न्या. अभय मंत्री यांच्या खंडपीठाने या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून महत्त्वाचे निर्देश दिले आहेत यामध्ये प्रशासक म्हणून नियुक्त केलेले सरपंच आणि त्यांच्या अध्यक्षतेखालील समितीला कोणतेही मोठे आर्थिक व्यवहार किंवा कॅन्ट्राट देण्याचे अधिकार नसतील. कर्मचाऱ्यांचे वेतन, पाणी बिल, वीज बिल आणि इतर अत्यावश्यक दैनंदिन खर्च वगळता इतर कोणत्याही निधीचा वापर करता येणार नाही. तसेच राज्य सरकारने या नियुक्त्या कोणत्या निकषावर केल्या, याबाबत २७ मार्चपर्यंत आपले स्पष्टीकरण प्रतिज्ञापत्राद्वारे सादर करावे.

पुढील सुनावणी एप्रिलमध्ये आता संपूर्ण राज्याचे लक्ष २७ मार्च रोजी सरकार काय उत्तर सादर करणार याकडे लागले आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ७ एप्रिल महिन्यात होणार असून, तोपर्यंत राज्यातील ग्रामपंचायतीं मध्ये केवळ 'केअरटेकर' (काळजीवाहू) स्वरूपाचेच काम चालणार आहे. नवीन विकासकामे आणि मोठ्या निधीचे वाटप आता न्यायालयाच्या अंतिम निर्णयावर अवलंबून असणार आहे.

## चेन्नई सुपर किंग्जला धक्का

**चेन्नई, ता. २० :** आयपीएलचा १९ वा हंगाम सुरु होण्यापूर्वी चेन्नई सुपर किंग्जला मोठा धक्का बसला आहे. ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज नॅथन एलिस दुखापतीमुळं स्पर्धेबाहेर गेला आहे. चेन्नई सुपर किंग्जकडून आता नॅथन एलिसच्या जागी बदली खेळाडूचा शोध घेतला जात आहे. स्पोर्ट स्टारच्या रिपोर्टनुसार नॅथन एलिस हॅम स्ट्रिंगच्या दुखापतीमुळं स्पर्धेबाहेर गेला आहे. नॅथन एलिस आयपीएलबाहेर गेल्यानं चेन्नई सुपर किंग्जला मोठा धक्का बसला आहे. चेन्नई सुपर किंग्जच्या टीमसाठी डेथ ओव्हर स्पेशालिस्ट म्हणून नॅथन एलिस महत्त्वाची कामगिरी करु शकला असता. स्पोर्ट स्टार नुसार चेन्नई सुपर किंग्ज नव्या खेळाडूच्या शोधात आहे. चेन्नई सुपर किंग्जचे सीईओ के. एस. विश्वनाथन यांनी नॅथन एलिस महत्त्वाचा वेगवान गोलंदाज होता,तो डेथ ओव्हर मध्ये महत्त्वाची कामगिरी करु शकला असता. आमच्यासाठी हा मोठा धक्का असल्याचं म्हटलं. सीएसकेचा यापूर्वीचा वेगवान गोलंदाज मथीशा पथिराना या हंगामात केकेआरकडून खेळणार आहे.

# शिव-भीम सैनिकांवरील गुन्हे रद्द करा; नम्रता कांबळे यांची सुनेत्रा पवारांकडे मागणी

**पुणे, ता. २० :** पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यात शिवजयंती आणि भीमजयंती उत्सवानंतर दाखल झालेल्या गुन्ह्यांवरून आता राजकीय आणि सामाजिक पातळीवर चर्चा सुरू झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडीच्या उपाध्यक्षा नम्रता कांबळे यांनी या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाची मागणी पुढे केली आहे. उत्सव काळात कार्यकर्त्यांवर नोंदवलेले गुन्हे विशेष बाब म्हणून तातडीने मागे घ्यावेत.

छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी मोठ्या उत्साहात मिरवणुका, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सामाजिक उपक्रम आयोजित केले जातात. मात्र, अनेक ठिकाणी परवानग्या, ध्वनीप्रदूषणाचे




नियम किंवा वाहतूक व्यवस्थेमुळे किरकोळ वाद निर्माण होतात. याच कारणांमुळे काही तरुण कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल झाल्याचं समोर आलं आहे. नम्रता कांबळे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिलेल्या निवेदनात स्पष्ट केलं की, या तरुणांची गुन्हेगारी पार्श्वभूमी नसून ते केवळ उत्सवात सक्रिय सहभाग घेत होते. मात्र, त्यांच्या नावावर गुन्हे नोंदवल्याने पुढील आयुष्यात सरकारी नोकरी किंवा इतर संधी मिळवताना अडथळे निर्माण होऊ शकतात. त्यामुळे शासनाने संवेदनशीलता दाखवत हे गुन्हे मागे घ्यावेत, अशी त्यांची भूमिका आहे. या मागणीला स्थानिक आमदार आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनीही पाठिंबा दिला आहे. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावना शासनापर्यंत पोहोचवण्याचे आश्वासन दिले आहे.

ही मागणी का महत्त्वाची आहे, याकडे लक्ष देणं गरजेचं आहे. एका बाजूला कायद्याचं पालन आवश्यक असलं, तरी दुसऱ्या बाजूला उत्सवां मधील किरकोळ घटनांमुळे तरुणांच्या करिअरवर दीर्घकालीन परिणाम होऊ नये, हीही समाजाची अपेक्षा आहे. यापूर्वीही राज्य सरकारने अशा काही प्रकरणांत गुन्हे मागे घेतले आहेत.

## संकट काळात तरी शासनाने संवेदनशीलता दाखवावी : जयंत पाटील

**पुणे, ता. २० :** महाराष्ट्रातील अनेक भागांना सध्या अवकाळी पाऊस व गारपिटीने झोडपले आहेत. त्यामुळे अक्षरशः काढणीला आलेली रब्बी पिके आडवी झाली आहेत. अनेक फळबागांचेही नुकसान झाले असून त्यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने तत्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत जाहीर करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी केली आहे.

संपूर्ण राज्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. उभ्या पिकांचे, फळबागांचे तसेच काढणीस आलेल्या पिकांचेही नुकसान होऊन शेतकरी संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य



शासनाने तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट आणि योग्य ती आर्थिक मदत जाहीर करावी. मदत देताना कोणत्याही प्रकारची अट न ठेवता शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. शेतकरी हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे या संकटाच्या काळात शासनाने संवेदनशीलता दाखवत त्वरित निर्णय घ्यावा, अशी मागणी जयंत पाटील यांनी सोशल मीडियावरील पोस्टमधून केली आहे.



## भारत आता रशियाकडून एलपीजी खरेदी करणार

**नवी दिल्ली, ता. २० :** आखाती देशांत युद्धजन्य परिस्थिती निर्माण झालेली असल्याचा फटका भारताला बसत आहे. भारतात गॅसचा तुटवडा निर्माण झाल्याचा दावा विरोधक करत आहेत. मात्र, नागरिकांनी या अफवांना बळी पडू नये, गॅसचा साठा पुरेसा उपलब्ध असल्याचा दावा केंद्र सरकारकडून केला जात आहे. मात्र, असं असलं तरी LPG गॅस सिलिंडरसाठी अनेक शहरांत नागरिकांच्या रांगा लागल्याचं पाहायला मिळत आहे.

देशात एलपीजी गॅसची टंचाई निर्माण होऊ नये म्हणून आता भारत सरकार मोठं पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे. भारत आता रशियाकडून एलपीजी खरेदी करण्याची शक्यता आहे. याबाबतचे संकेत परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी दिले आहेत. रणधीर जयस्वाल यांनी, मध्य पूर्वेतील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर ऊर्जा पुरवठ्यासाठी आपले पर्याय वाढवण्यासाठी केंद्र सरकार सर्व ठिकाणांहून एलपीजी खरेदी करण्याचा प्रयत्न करत आहे. लोकांच्या इंधनाच्या गरजा पूर्ण होतील याची खात्री सरकार करत आहे असे म्हटले.

## मळणी मशीनमध्ये स्कार्फ अडकला; पुरंदरमध्ये शेतकरी महिलेचा दुर्दैवी मृत्यू

**जेजुरी, ता. २० :** शेतातील ज्वारी मळणी करताना डोक्याला बांधलेला स्कार्फ मशीनच्या चक्रात अडकल्याने एका शेतकरी महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. वनपुरी (ता. पुरंदर) हद्दीत हि घटना घडली आहे. मंगल तुकाराम कुंभारकर (वय -५५) असे मृत महिलेचे नाव असून या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. याबाबत दत्तात्रय रोहीदास यादव (रा. माळशिरस, ता. पुरंदर) यांनी जेजुरी पोलिस ठाण्यात माहिती दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगल कुंभारकर या त्यांचा मुलगा विकास कुंभारकर यांच्यासह माळशिरस येथील पाटीलवस्ती परिसरातील शेतात ज्वारीची मळणी करत होत्या. मळणी मशीनमध्ये कणसे टाकत असताना त्यांच्या डोक्याला बांधलेला



स्कार्फ मशीनच्या चक्रात अडकला. काही क्षणांतच त्या मशीनकडे जोरात ओढल्या गेल्याने गंभीर अपघात घडला.

मशीनजवळ उपस्थित असलेले मशीन मालक नामदेव भानुदास बनकर (रा. राजुरी, ता. पुरंदर) यांनी तातडीने मशीन बंद करण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोपर्यंत उशीर झाला होता आणि या भीषण अपघातात मंगल कुंभारकर यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची नोंद जेजुरी पोलिस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## ...अखेर रेखाचित्रावरून आरोपी ओळखण्याचे पोलिसांचे आवाहन

### अल्पवयीन मुलीवर ॲसिड हल्ला; ५० तास उलटले तरी आरोपी फरार

**अहिल्यानगर, ता. २० :** संगमनेर वडगाव पान परिसरात घडलेल्या अल्पवयीन मुलीवरील सिड हल्ल्याने तालुकाच नव्हे तर संपूर्ण जिल्हा चाग़लाच हादरला असताना तब्बल ५० तास उलटूनही आरोपी पोलिसांच्या हाती लागत नसल्याने पोलिस यंत्रणेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अखेर हतबल झालेल्या पोलिसांनी संशयिताचे रेखाचित्र प्रसिद्ध करत नागरिकांकडे मदतीचे आवाहन केले आहे.

मंगळवार मार्चला शाळा सुटल्यानंतर शिकवणी आटोपून घरी जात असलेल्या एका अल्पवयीन मुलीला महादेव मळा परिसरातील कच्च्या रस्त्यावर अज्ञात माथेफिरूने गाठले. पत्ता विचारण्याचा बहाणा करत थांबवून त्याने बाटलीतील सिडसदृश द्रव



थेट मुलीच्या चेहऱ्यावर फेकत थरारक हल्ला केला आणि घटनास्थळावरून पसार झाला. या अमानुष प्रकारामुळे परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

जखमी मुलीवर लोणी येथील प्रवरा मेडिकल ट्रस्ट रुग्णालयात उपचार सुरू असून डॉक्टरांच्या देखरेखीखाली तिची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकरणी तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता कलम १२४ (१) व १२६ (२) अंतर्गत कारवाई सुरू आहे.

दरम्यान गुन्ह्याचा तपास सुरू असल्याचे सांगत पोलिसांनी गुन्हे शोध पथक, फॉरेन्सिक युनिट तसेच शहर व तालुका पोलिसांची स्वतंत्र पथके मैदानात उतरवली आहेत. मात्र एवढ्या मोठ्या यंत्रणेच्या हालचाली असूनही आरोपीचा मागमूस लागत नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

प्रत्यक्षदर्शींच्या मदतीने संशयित आरोपीचे रेखाचित्र तयार करण्यात आले असून ते प्रसारमाध्यमांसमोर सादर करण्यात आले आहे. पोलिसांचे नागरिकांना आवाहन रेखाचित्रातील व्यक्तीबाबत कोणतीही माहिती असल्यास तात्काळ संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले असून माहिती देणाऱ्याचे नाव गुपित ठेवण्यात येणार आहे.


## अवकाळीमुळे पुणे जिल्ह्यात शेतीचे मोठे नुकसान

### तातडीने पंचनाम्यांचे सुनेत्रा पवार यांचे निर्देश

**बारामती, ता. २० :** पुणे जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांत झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. जोरदार वाऱ्यासह काही ठिकाणी गारपिटीमुळे उभ्या पिकांना फटका बसला असून अनेक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी तातडीने दखल घेत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत परिस्थितीचा आढावा घेतला. नुकसानग्रस्त भागांचे त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत मिळावी, असे स्पष्ट निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले.

अवकाळी पावसामुळे काढणीस आलेला गहू, ज्वारीसह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. याशिवाय आंब्याचा मोहर गळून पडला असून द्राक्षबागांनाही



मोठा फटका बसला आहे. परिणामी शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

या परिस्थितीत प्रशासनाने तत्परतेने काम करत पंचनामे पूर्ण करून शासनाच्या मदतीचा लाभ तातडीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावा, असेही उपमुख्यमंत्री पवार यांनी स्पष्ट केले.

## डॉलरने ९३ चा टप्पा ओलांडला

**मुंबई, ता. २० :** जागतिक बाजारातील घडामोडी आणि आखाती देशात सुरू असलेल्या युद्धाच्या हिंदुस्थानच्या चलनाला मोठा फटका बसला आहे. शुक्रवारी सकाळी बाजारात व्यवहार सुरू होताच रुपया अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ऐतिहासिक निचांकी पातळीला पोहोचला. रुपयाच्या इतिहासात पहिल्यांदाच डॉलरने ९३ रुपयांचा टप्पा ओलांडला असून आता रुपयाचा भाव ९३.२४ वर पोहोचला आहे.


इस्त्रायल आणि इराणमधील वाढत्या संघर्षाचा परिणाम जागतिक बाजारपेठेवर झाला असून, सुरक्षित गुंतवणूक म्हणून डॉलरकडे कल वाढला आहे. क्रूड ऑईलच्या किमती प्रति बॅरल ११५ डॉलरच्या वर गेल्या आहेत. या सगळ्याचा थेट परिणाम रुपयावर झाला आहे. तसेच शेअर बाजारातून परकीय गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणात पैसा काढून घेतल्यामुळे रुपयावर दबाव वाढला आहे.

# थेऊर येथे उपचाराचे पैसे मागितल्याने डॉक्टरवर हल्ला; डॉक्टर व रुग्ण जखमी, एकावर गुन्हा

**लोणी काळभोर, ता. १९ :** दारूच्या नशेत आलेल्या व्यक्तीने उपचाराचे पैसे देण्यास नकार देत डॉक्टरशी वाद घालून क्लिनिकमध्ये तोडफोड केल्याची घटना घडली आहे. ही घटना थेऊर फाटा येथील श्रेया क्लिनिकमध्ये बुधवारी (ता. १८) दुपारी सुमारे पावणे एक वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या घटनेत डॉक्टर व एक रुग्ण जखमी झाले असून क्लिनिकच्या काचेच्या दरवाज्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

संतोष रमेश गुंजाळ (काकडे वस्ती, थेऊर, ता. हवेली) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत डॉ. संतोष महादेव गायकवाड (वय ३७) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या घटनेमुळे थेऊरसह परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डॉ. संतोष गायकवाड हे तुपे कॉम्प्लेक्स, थेऊर फाटा येथे श्रेया क्लिनिक चालवतात. बुधवारी डॉ. गायकवाड हे रुग्णांची तपासणी करत असताना संतोष गुंजाळ हा इसम अचानक तपासणी कक्षात आला. त्याच्या डोक्याला जखम झाल्याने डॉक्टरांनी प्रथमोपचार करून पट्टी बांधली व औषधे लिहून दिली. उपचाराचे २२० रुपये बिल मागितल्यावर संबंधित इसमाने पैसे




देण्यास नकार दिला. आणि थेट डॉ. संतोष गायकवाड यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली.

संतोष गुंजाळ याने संतापाच्या भरात क्लिनिकमधील टेबलवरील काच ढकलली तसेच डॉ. संतोष गायकवाड यांचा मोबाईल हिसकावून घेण्याचाही प्रयत्न केला. त्यानंतर संतोष गुंजाळ क्लिनिकबाहेर जाऊन रस्त्यावर पडलेले दगड उचलून क्लिनिकच्या काचेच्या दरवाज्यांवर आणि पार्टीशनवर फेकून मारत तोडफोड केली. या घटनेत क्लिनिकच्या प्रवेशद्वारासह दोन काचेचे दरवाजे फुटले.

डॉ. गायकवाड व त्यावेळी उपस्थित असलेले रुग्ण हनुमंत बळे (रा. उरुळी कांचन) हे बाहेर येत असताना आरोपीने पुन्हा दगडफेक केली. या दगडांमुळे डॉ. गायकवाड यांच्या पाठीवर व डाव्या हातावर दुखापत झाली, तर उडालेल्या काचेच्या तुकड्यांमुळे रुग्णाच्या हाताला किरकोळ जखम झाली आहे. दारूच्या नशेत असलेला आरोपी संतोष गुंजाळ हा मोठा दगड उचलताना तोल जाऊन स्वतःच्या डोक्यालाच मार लागल्याचीही माहिती पोलिसांनी दिली. घटनेनंतर डॉ. गायकवाड यांनी ११२ क्रमांकावर कॉल करून पोलिसांना माहिती दिली, त्यानंतर सर्वांना पोलीस ठाण्यात नेण्यात आले.

दरम्यान, या प्रकरणी संतोष गुंजाळ याच्याविरुद्ध लोणी काळभोर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ११८(१), १२५, ३२४(४), ३५२ तसेच महाराष्ट्र वैद्यकीय सेवा व्यक्ती व संस्थांवरील हिंसाचार प्रतिबंधक अधिनियम २०१० अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस करत आहेत.